नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख अहमद
<u>निशाणी क्रमांक २३</u>

**<u>आरोपीला व्हीसीद्वारे न्यायालयासमक्ष हजर केले.</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०५ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– परेश कमलाकर विसपुते
वय :– ४० वर्ष, व्यवसाय :– सराफा,
राहणार :– बुलढाणा, ता. जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. मी आरोपीला ओळखतो. मी आरोपीला पाहिलेले आहे. मी आरोपीला व्ही.सी द्वारे पाहिले परंतु निश्चितपणे सांगता येणार नाही की तो आरोपी हाच आहे. मागील २५ वर्षापासुन माझे सोन्याचे दुकान आहे. मागच्या वर्षी माझ्या दुकानात चार व्यक्ती आले होते. त्यांनी मला सोने मोडण्यास विनंती केली परंतु त्यांचेकडे बिल नव्हते. मी बील नसतांना सोने घेत नाही त्यामुळे मी त्यांना नाही म्हटले परंतु आरोपीची मुलगी संभाजी नगर येथे दवाखाण्यात भरती असल्यामुळे ते खुप रडत होते त्यामुळे मला त्यांची दया आली. मी त्यांना म्हटले की मी तुमची वस्तु बाजुला ठेवतो तुम्ही पैसे परत करुन तुमचे सोने चांदी घेवुन जा. त्यांनी त्यांचेसोबत अंदाजे ४५ ग्रॅमचे सोने व ८५० ग्रॅम चांदी घेवुन आले होते. मी सदर दागीन्यांचे मोबदल्यात त्यांना एक लाख पन्नास हजार रुपये दिले. मला आरोपीने त्याची मुलगी भरती असल्याबाबतचे कागदपत्र दाखविले होते. काही दिवसानंतर मला शेगांव शहर पोलीस स्टेशन येथुन फोन आला व त्यांनी सांगीतले की शेगांव येथे घरफोडी झाली व चोरी गेलेले दागीने तुमच्या दुकानात आरोपीने विकले त्या अनुषंगाने मी सदर दागीने पोलीस स्टेशन शेगांव शहर येथे नेवुन दिले. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. आता मला जप्तीपत्रक दाखविले. त्यावर माझी सही आले. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येतो. पोलीसांनी मला आरोपीने घरफोडी केल्याबाबत माहिती दिली. आरोपीने माझ्या दुकानाव्यतीरीक्त कुठे कुठे दागीने विकले याची मला माहीती नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांचेमार्फत.</u>**

२. हे म्हणने खरे आहे की सोनाराचे दुकान चालविण्याकरीता परवाना पाहिजे तसेच लायसन्स पाहिजे व जीएसटी क्रमांक पाहिजे याची मला माहीती आहे. हे म्हणने खरे आहे की जीएसटी असणा–या दुकानाच्या व्यवहारीक नोंदी ठेवाव्या लागतात. हे म्हणने खरे आहे की सोनाराचा व्यवसाय करतांना प्रत्येक व्यवहाराची नोंद ठेवणे आवश्यक आहे. मी पोलीसांना आरोपीने माझेकडे सोने ठेवुन पैसे दिल्याबाबत व्यवहार केल्यासंबंधी कुठलेही दस्त दिले नाही. हे म्हणने खरे नाही की माझे दुकानावर आरोपी आले, मी त्यांचे सोने ठेवुन त्यांना पैसे दिले हे मी खोटे सांगत आहे. मी आयकर भरतो. मी केलेल्या व्यवहाराच्या नोंदी त्यात करणे आवश्यक आहे. मी दिड लाखाच्या व्यवहाराबाबत कोणताही दस्त पोलीसांना दिला नाही.

मी पोलीसांना जबाब देतांना असे सांगीतले होते की, काही दिवसानंतर मला शेगांव शहर पोलीस स्टेशन येथुन फोन आला व त्यांनी सांगीतले की शेगांव येथे घरफोडी झाली व चोरी गेलेले दागीने तुमच्या दुकानात आरोपीने विकले. सदर बाब माझे जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| **सा.वा.दा.ब.अ.क.केले.** | **माझे समक्ष,** |
| MADHURI KEWAL GOTE | Digitally signed by MADHURI KEWAL GOTE<br>Date: 2026.04.01 15:04:42 +0530 |
| **( एम. के. गोटे )** | **( एम. के. गोटे )** |
| न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, | न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, |
| शेगाव. (कोर्ट नं.२) | शेगाव. (कोर्ट नं.२) |
| **दिनांक – ०१.०४.२०२६.** | **दिनांक – ०१.०४.२०२६** |